# अकोले ते श्रीरामपूर परिसरात दोनशे बिबट्यांचा वावर

## तीन वर्षांच्या पाहणीतील निष्कर्ष

अकोले (प्रतिनिधी):- तालुक्यातील रुंभोडीपासून श्रीरामपूर पर्यंतच्या उस क्षेत्र असलेल्या प्रवरा पट्टयात २०० बिबटे असल्याचा अंदाज बिबटयाच्या प्रश्नाच्या अभ्यासक विद्या अत्रेया यांनी व्यक्त केला आहे. बिबटयांना पकडून दुसरीकडे सोडून त्यांच्या प्रचलीत पद्धतीने बिबटयांचा हा प्रश्न सुटणार नाही.

बंगलोरच्या इंडियन इन्स्टिटयुट ऑफ सायन्सच्या सहकार्याने सन २००७ पासुन बिबटयांच्या प्रश्ना संदर्भात अकोले तालुक्यात श्रीमंती अत्रेया यांनी काम सुरु केले. पुणे जिल्हयातील जुन्नर येथील २ वर्षात बिबटयाने ५० लोकांनवर हल्ले केले तेव्हा पासून आपण वनजीव्य प्राण्याविषयी अभ्यास सुरु केला. तालुक्यातील रुंभोडी ते संगमनेर तालुक्यातील धांदरफळ या ३०० चौ. कि. अंतरावर उस क्षेत्रात १२ बिबटे कॅमेरॅत आढळून आले. त्यामध्ये ४ बछडयांचा समावेश आहे. रुंभोडी ते श्रीरामपूर या भागात २०० असून प्रवरा परिसरात काही ठिकाणी बिबटयाची विष्ठा आढळून येते. अकोल्यात ३ हजार डूक्करे व २०० कुत्रे असल्याचा सर्व करण्यात आला आहे. बिबटयाने काही



डुक्करांनवर मारलेला ताव हे ही आढळून आले तर बिबटयाने जनावरावर केलेल्या हल्ल्याची रक्कम संबंधीत खात्याकडून ३ वर्ष मिळत नाही. संबंधीत विभागाने हि रक्कम नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आदा करावी.तसेच शेतकऱ्यांना जनावरांना शेड बांधण्यासाठी सबसिडी मिळावी या संदर्भात तालुक्यातील लोक प्रतिनिधीची भेट घेवून त्यांना बिबटयाच्या हल्ल्यात मूत्यूमुखी पडणाऱ्यांना तातडीने आर्थीक मदत मिळावी. शासन दरबारी प्रयत्न करावे असे सांगितले.

बिबटया नर जातीचा असेल तर त्याचे वजन ६० किलो तर मादी ४० किलो वजनाची असते. बिबटया एकदा जेरबंद केला तर दुसरा येतच राहील. बिबटयाचा संघर्ष सुरुच राहणार आहे. बिबटया स्वतःहून दुसऱ्यावर चाल करत नाही. मात्र त्यास धोका जाणवल्यास तो इतरांवर हल्ला करतो. मोकाट जनावरे कमी करणे, गाव स्वच्छ करणे ही कामे बिबटयाच्या नियंत्रणासाठी करावी लागणार आहे. अकोले परिसरात झालेल्या सर्वक्षेणात बिबटयांबरोबरच ९० तरस, लांडगे, दोन रानमांजरे त्यांना आढळले. बिबटया एका रात्री १० ते १५ किलोमीटर प्रवास करतो. त्यांचे ज्वलंत उदाहरण रेडे येथील बिबटया कॅमेरॅत बंदीस्त झालेला. दुसऱ्या दिवशी आंबडच्या शिवारात आढळून आला. अकोले शिवारात ७ बिबटे शहराच्या मध्यवस्तीतून जात असल्याचे कॅमेऱ्यातून आढळून आले. बिबटयाच्या शोध मोहिमेसाठी भूलतज्ज्ञामार्फत त्यांना त्याला भूलीचे इंजेक्शन देऊन बिबटयाच्या गळयात कॉलरआयडी बसविण्यात येतो. त्यानंतर त्याचा वावर किती किलोमीटरच्या परिसरात होतो. याची उपग्रहाद्वारे माहिती घेण्यात येते. जुन्नर येथे सोडण्यात आलेला बिबटया १००किलोमीटर अंतर पार करुन पुन्हा कुंभेफळच्या शिवारात कॉलरआयडीमुळे निदर्शनास आला.

बिबटयाच्या खाद्यामध्ये ६० टक्के वाटा डूक्कर व ३९ टक्के वाटा कुत्रे व शेळयामेढयांचा आहे. मुंगूस, उदमांजर, घुस या सारखी जंगली जनावरांचे त्यांच्या आहारातील प्रमाण अवघ्ये १ टक्का असल्याचे आढळून आले. बिबटयांनी मारलेले भक्ष तरस पळवितात. तरसापासुन आपल्या खाद्याचा बचाव करण्यासाठी त्याने मारलेले जनावर झाडावर नेऊन ठेवल्याचे कॅमेरॅत आढळून आले. त्याने भक्ष केलेल्या मृत जनावर जमिनीत पुरले तरी बिबटयाचा वावर त्याठिकाणी पुन्हा होतो. तो जनावराचे मांस देखील खातो. हे कळस येथील एका शेतकऱ्याच्या मेलेल्या वासराच्या ठिकाणी पथक कॅमेरे लावून शोधून काढले. जंगलाबाहेर ऊस क्षेत्रातील बिबटयांचे अस्तित्व पूर्णपणे नष्ट करता येणार नाही.